# साहित्यक्षेत्रातील नामवंत

गोवा मुक्त झाल्यानंतर पुढील पंचवीस वर्षांच्या काळात गोमंतकातील साहित्यक्षेत्राला प्रभावित करणाऱ्या घटनांचा आणि गोमंतकीय मराठी साहित्य - संस्कृतीवर आपली नाममुद्रा उमटविणाऱ्या काही लेखकांचा येथे परामर्श येथे घेतलेला आहे. या विवेचनासाठी निवडलेली १९६१ ते १९८६ ही कालमर्यादा ढोबळमानानेच आहे.

## डॉ. वासुदेव सावंत

साडेचारशे वर्षांच्या पारतंत्र्यातून गोवा १९ डिसेंबर १९६१ ला मुक्त झाला आणि एका अर्थाने भारताच्या स्वातंत्र्यालाच परिपूर्णता प्राप्त झाली. पोर्तुगीज काळात गोमंतकीयांच्या आचार-विचार, उच्चार आणि कृती - स्वातंत्र्यावर असणारी बंधने नाहीशी झाली आणि स्वतंत्र भारताप्रमाणेच मुक्तीनंतरचा गोवा जीवनाच्या सर्व क्षेत्रात विकासाच्या दिशेने नव्या उर्मीने वाटचाल करू लागला. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात झपाट्याने बदल होऊ लागले. एक नवी संस्कृती येथे रुजू, वाढू लागली. साहित्यादी कला या संस्कृतीचेच अभिन्न अंग असल्याने साहित्याच्या क्षेत्रातही मुक्तीनंतरच्या काळात विकासाचे धुमारे नव्या जोमाने फुटू लागले. परंपरेने गोव्याची साहित्यसंस्कृती बव्हंशी मराठीच असल्याने मराठी गोमंतकीय साहित्यातही संख्यात्मक वाढ तर झालीच. समाजाच्या सर्व स्तरातले नवे नवे लेखक लिहू लागले. एवढेच नव्हे तर आपल्या लेखनाने केवळ गोमंतकातच नव्हे तर एकूण मराठी साहित्यातच आपली ठसठशीत नाममुद्रा उमटविणारे लेखक मुक्तिपूर्व काळाप्रमाणेच मुक्तीनंतरच्या काळातही गोव्यात निर्माण झाले. मराठी साहित्याच्या क्षेत्रात झालेल्या या विकासाची बदलाची काही कारणेही होती.

एक तर शैक्षणिक क्षेत्रात होणारा विकास हा साहित्याच्या विकासाला महत्त्वाचा हातभार लावीत असतो. मुक्तीनंतरच्या काळात गोमंतकात शिक्षणाचा प्रसार एवढ्या झपाट्याने झाला की थोड्याच काळात साक्षरतेच्या बाबतीत गोवा हे भारतातील एक अग्रेसर राज्य बनले. अनेक शाळा - विद्यालयाप्रमाणेच विविध विद्याशाखांचे शिक्षण देणारी नवी नवी महाविद्यालये, पदव्युत्तर केंद्र आणि १९८५ मध्ये विद्यापीठही स्थापन झाले. प्रमुख महाविद्यालयातून सुरू झालेले मराठी भाषा व साहित्याचे अध्ययन आणि अध्यापन हेही मराठी साहित्याच्या विकासात महत्त्वाचे ठरलेले आहे. मराठी साहित्याच्या दृष्टीने महत्त्वाची ठरलेली मुक्तिनंतरच्या काळातील महत्त्वाची घटना म्हणजे मराठी दैनिक - नियतकालिकांचा उदय आणि मराठीच्या संवर्धन व प्रसारासाठी जुन्या - नव्या संस्थांनी केलेले कार्य हे होय. मुक्तीनंतर स्थापन झालेल्यापैकी दै. गोमन्तक, नवप्रभा व राष्ट्रमत या प्रमुख दैनिकांनी एकूण गोमंतकीय समाजजीवनातच जशी महत्त्वाची कामगिरी बजावलेली आहे तशी गोमंतकीय मराठी साहित्याच्या विकासातही पार पाडलेली आहे. या दैनिकांनी आपल्या पुरवण्यांमधून जुन्या नामवंत लेखकांबरोबर नवनव्या लेखकांनाही, लिहिते केले. विविध सदरे लिहवून घेतली. यापैकी बरेचसे लेखन नंतर ग्रंथरूपाने येऊन त्याने मुक्तीनंतरच्या साहित्यात मोलाची भर घातलेली आहे. बहुतांश सदरलेखन ग्रंथरूपाने प्रसिद्ध होण्याबाबत 'गोमन्तक' या दैनिकाचा मुख्य उल्लेख करावा लागेल. 'गोमन्तक' या दैनिकांचे संपादन तर बा. द. सातोस्कर, माधव गडकरी, नारायण आठवले (आणि सध्याचे सुरेश नाईक) अशा लेखकांनीच भूषविलेले असल्याने गोमंतकीय साहित्याच्या विकासात, साहित्यक्षेत्र प्रभावित करण्यात दैनिक गोमन्तकचा सहभाग मोठा आहे. गोव्यातील नवीन लेखकांना पुढे आणण्यासाठी काही काळ पु

स्तक - प्रकाशनाचे कार्यही गोमन्तकने केलेले आहे. अशा प्रकारे मराठी दैनिकांची स्थापना ही मुक्तीनंतरच्या काळातील गोमंतकीय साहित्यक्षेत्रावर ठसा उमटविणारी महत्त्वाची घटना आहे.

मुक्तीनंतरच्या साहित्याच्या विकासात येथील सांस्कृतिक संस्था, मंडळांचे कार्यही महत्त्वाचे आहे. गोमंतक साहित्य सेवक मंडळ, गोमंतविद्या निकेतन यासारख्या संस्था मुक्तिपूर्व काळापासूनच कार्यरत असल्या तरी गोवामुक्तिनंतर त्यांना अधिक मुक्तपणा व प्रेरणा मिळाली. गोमंतकाची मराठी परंपरा वर्धिष्णू करण्यासाठी स्थापन झालेल्या मराठी भाषा परिषद आणि १९८७ मध्ये स्थापन झालेली गोमंतक मराठी अकादमी यांनी मुक्तीनंतरच्या काळात मराठी भाषा आणि साहित्य यासाठी केलेले कार्य सर्वांनाच माहीत आहे. या सर्व संस्थांनी व्याख्याने, वाङ्मयीन स्पर्धा, साहित्य - संमेलने, ग्रंथांना पारितोषिके, ग्रंथप्रकाशन, वाङ्मयीन मुखपत्रे इ. मार्गांनी मराठी साहित्यनिर्मितीला मुक्तीनंतरच्या काळात मोठीच चालना दिली. या विविध कारणांनी मुक्तीनंतरच्या काळात नवे मराठी लेखक पुढे आले आणि मुक्तिपूर्व काळापासून लिहिणारेही नव्या जोमाने व उत्साहाने लिहू लागले. मुक्तीनंतरच्या गोमंतकीय मराठी साहित्यावर यापैकी अनेक लेखकांनी आपली नाममुद्रा गोमंतकीय नव्हे तर एकूणच मराठी साहित्यावरही ठसठशीतपणे उमटविलेली आहे. या सर्वांचाच परामर्श घेणं इथे शक्य नसले तरी मुक्तीनंतरचे मराठी साहित्य म्हटल्यानंतर चटकन डोळ्यासमोर उभी राहतात अशा नावांचा तरी निर्देश करणे आवश्यक आहे.

अशा लेखकांमध्ये जसे मुक्तिपूर्व काळातच मराठी साहित्यात प्रस्थापित होऊन मुक्तीनंतरच्या साहित्यातही अग्रभागी राहिलेले काही नामवंत आहेत तसे मुक्तीनंतर उदयाला आलेलेही अनेक लेखक आहेत. मुक्तीनंतरही प्रभावी राहिलेल्या पण मुक्तिपूर्व काळात नामवंत ठरलेल्या लेखकांमध्ये बा. भ. बोरकर, लक्ष्मणराव सरदेसाई आणि बा. द. सातोस्कर यांची नावे सहजपणेच डोळ्यासमोर उभी राहतात. केवळ गोमंतकीयच नव्हे तर पूर्ण मराठी साहित्याच्या इतिहासातच अधोरेखित झालेली ही नावे आहेत. बा. भ. बोरकर यांच्या नावाशिवाय जसा आधुनिक मराठी कवितेचा विचार करता येणार नाही तसा मराठी कथेचा विचार लक्ष्मणराव सरदेसाई यांच्याशिवाय अपूर्ण राहील. बा. भ. बोरकर यांची कविता म्हणजे सौंदर्यवादी लयबद्ध कवितेचा मराठीतील सर्वोत्तम आविष्कार आहे. त्यांना मराठी कवितेत कवी म्हणून पाय रोवून उभे करणारे दूधसागर, आनंदभैरवी, चित्रवीणा यासारखे कवितासंग्रह मुक्तिपूर्व काळातले असले तरी त्यांच्या एकूण दहा काव्यसंग्रहांपैकी गितार, चैत्रपुनव, कांचनसंध्या, अनुरागिणी, चिन्मयी हे पाच कवितासंग्रह गोवामुक्तीनंतर प्रकाशित झालेले आहेत. प्रामुख्याने निसर्ग आणि प्रेमानुभवात रंगलेली बोरकरांची सौंदर्यवादी कविता मुक्तीनंतरच्या काळात गितारपासून बदललेली आहे काय यावर मराठी समीक्षकांमध्ये एकमत नसले तरी स्वप्नरम्य बेहोषीत रमणारी त्यांची कविता आपल्या ठळक वैशिष्ट्यांसह मुक्तीनंतरच्या काळात अधिक प्रौढ, गंभीर आणि अंतर्मुख झालेली आहे हे मात्र निश्चितपणे दिसते.

पण बा. भ. बोरकर हे केवळ कवीच नव्हते, कथा, कादंबरी, ललितनिबंध अशा गद्य साहित्यप्रकारातही त्यांच्या प्रतिभेने स्वैर संचार केला. मराठी समीक्षकांनी प्रादेशिक म्हणून गौरविलेली भावीण, तसेच 'मावळता चंद्र' आणि 'काळोखातील वाट' या त्यांच्या तीन कादंबऱ्या मुक्तिपूर्व काळातच प्रकाशित झालेल्या होत्या. 'प्रियकामा' ही एकच पौराणिक कादंबरी त्यांनी मुक्तीनंतरच्या काळात लिहिलेली आहे. रामायणातील कैकयीची एक वेगळी प्रतिमा उभी करणारी ही कादंबरी त्यांनी मुक्तीनंतरच्या काळात लिहिलेली आहे. ही कादंबरी वाचनीय असली तरी मराठी कादंबरीत आपला ठसा उमटविण्यात ती फारशी यशस्वी ठरलेली आहे असे म्हणता येत नाही. त्यांच्या कथासंग्रहांपैकी 'समुद्राकाठची रात्र' हा एकच कथासंग्रह या काळात प्रकाशित झालेला असला तरी बोरकरांचे एकूण कथालेखन लक्ष्मणराव सरदेसाई यांच्या कथेपेक्षा काही वेगळ्या वाटेने जाणारे आहे असे वाटत नाही. बोरकरांचा पहिला लघुनिबंधाचा संग्रह तिशीच्या दशकातच प्रसिद्ध झालेला असला तरी त्यांचे बहुतांश ललितनिबंध लेखन मुक्तीनंतरच्या काळातच झालेले आहे. कवी म्हणून असणाऱ्या बोरकरांच्या सौंदर्यासक्त आणि काव्यात्म व्यक्तिमत्त्वाचे आणि त्याचबरोबर त्यांच्या चिंतनशील मनोवृत्तीचे प्रभावी दर्शन घडविणारे 'चांदण्याचे कवडसे', 'पावलापुरता प्रकाश' आणि 'घुमटावरले पारवे' या संग्रहातील ललितनिबंधांमधून घडते. मुक्तीनंतरच्या २०-३० वर्षांत गोमंतकीय साहित्यात ललितनिबंधाचे लेखन अपवादानेच दिसते. या पार्श्वभूमीवर विशुद्ध आणि कसदार ललितनिबंध लिहून बोरकरांनी गोमंतकीय मराठी साहित्य समृद्ध केलेले आहे.

मराठी कथेच्या प्रांतात लक्ष्मणराव सरदेसाई यांनी केलेले कार्य बोरकरांनी काव्यक्षेत्रात केलेल्या कार्याएवढेच महत्त्वाचे असल्याचा उल्लेख वर केलेलाच आहे. मुक्तीनंतरच्या काळात 'सोनेरी ऊन', 'पडसाद', 'बीजेची कोर' हे तीन स्वतंत्र आणि 'वेचक लक्ष्मणराव' हा निवडक कथांचा असे त्यांचे चार कथासंग्रह प्रसिद्ध झालेले आहेत. १९३० च्या आसपास यशवंत, किर्लोस्कर इ. मासिकांनी कथालेखनाला प्राधान्य दिल्याने मराठीत कथानिर्मितीची एक लाट आली आणि कथालेखनाला वाहून घेतलेली कथाकारांची एक पिढीच निर्माण झाली. या काळातले लक्ष्मणराव हे अग्रगण्य कथाकार. स्त्री - पुरुष संबंधातील मुक्तपणा, खानदानी गोमंतकीय परंपरेचे चित्रण, गोमंतकीय संस्कृतीचा अभिमान आणि या सर्वांबरोबरच स्वप्नरम्य दृष्टी यामुळे मराठी वाचक- समीक्षकांना लक्ष्मणरावांच्या कथेने फार प्रभावित केले. आज त्या काळापेक्षा मराठी कथा बदललेली असली तरी मराठी कथेतील आणि गोमंतकीय मराठी साहित्यावरील लक्ष्मणरावांचा ठसा पुसट होण्यासारखा नाही. फ्रान्सिस गोमिश यांच्या पोर्तुगीज कादंबरीचा त्यांनी 'ब्राह्मण' या नावाने केलेला अनुवादही काही मराठी समीक्षकांना आव्हानात्मक वाटलेला आहे.

वरील दोघांचे लेखन मुक्तिपूर्व काळातच मराठीत निरपवादपणे मान्य झालेले होतेच. पण गोमंतकीय साहित्याच्या दृष्टीने विचार केल्यास मुक्तीनंतरच्या पाव शतकात बा. द. सातोस्कर यांचे वाङ्मयीन कार्य वरील दोघांपेक्षाही अधिक महत्त्वाचे आहे असे मला वाटते. केवळ कादंबरीकार म्हणूनच नव्हे तर मुक्तीनंतर गोव्यात नव्याने उदयास येऊ पाहणाऱ्या साहित्य, संस्कृतीची जडणघडण करण्यात एक लेखक, पत्रकार - संपादक, अनुवादक, प्रकाशक अशा अनेक नात्यांनी त्यांनी केलेले कार्य ऐतिहासिक मोलाचे आहे. कथा - कादंबरी तसेच आत्मचरित्र, प्रवासवर्णन - स्थळवर्णन या साहित्यप्रकारात समर्थपणे लेखन करणाऱ्या सातोस्करांनी 'गोमंतक : प्रकृती आणि संस्कृती' असे सांस्कृतिक इतिहासलेखनाचे अवाढव्य कामही सहजपणे पेललेले आहे. त्यांच्या बहुतांश कादंबऱ्या मुक्तीनंतरच्या काळातच लिहिल्या गेलेल्या आहेत. बोरकरांच्या 'भावीणी'पेक्षाही पुरोगामी दृष्टी व्यक्त करणारी 'मेनका' आणि गोव्याच्या स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास जिवंतपणे उभी करणारी 'आज मुक्त चांदणे' या सातोस्करांच्या कादंबऱ्या गोमंतकीय साहित्यात अजरामर होऊन राहणाऱ्याच आहेत. 'बादसायन' हे स्वतःबरोबरच समकालीन कालखंडाचे चित्रण करणारे त्यांचे आत्मचरित्र आचार्य प्र. के. अत्रे यांच्या 'कऱ्हेचे पाणी' या आत्मचरित्राची आठवण करून देणारे आहे. स्वतंत्र कथालेखनाबरोबरच परभाषिक अनेक कथांचे अनुवाद जसे त्यांनी स्वतः केलेले आहेत तसेच इतरांकडून करवूनही घेतलेले आहेत. पण त्यांच्या या ललितसाहित्यापेक्षाही प्रकाशक, संपादक आणि सांस्कृतिक इतिहासकार म्हणून त्यांनी केलेली कामगिरी गोमंतकीय वाङ्मयीन संस्कृतीच्या क्षेत्रात अधिक मोलाची आहे. गोवामुक्तीच्या प्रारंभीच्या काळातच त्यांच्या प्रेरणेने स्थापन झालेल्या दैनिक 'गोमन्तक'चा प्रभाव मुक्तीनंतरच

च्या गोमंतकीय सांस्कृतिक विश्वाला किती व्यापून राहिलेला आहे हे सांगण्याची गरज नाही. या प्रभावामागे 'गोमन्तक'चे पहिले संपादक म्हणून सातोस्करांचा वाटा फार मोठा आहे. सागर प्रकाशन संस्था आणि सागर हे नियतकालिक चालवून गोव्यातील साहित्यनिर्मितीला आणि लेखकांना त्यांनी प्रेरणा दिली. गोमंतकाच्या सामाजिक, राजकीय, भाषा - संस्कृती -, कलाजीवनाचा प्राचीन काळापासूनचा भव्य पट उलगडण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा 'गोमंतक : प्रकृती आणि संस्कृती'चे सहापैकी केवळ तीनच खंड प्रकाशित झाल्यामुळे अपूर्ण राहिलेली असली तरी साडेसातशेहून अधिक पृष्ठांचे हे तीन खंड पाहिल्यावर सातोस्करांच्या कामाचा आवाका पाहून आपण थक्क होतो. गोमंतकाची माहिती मिळविण्यासाठी संदर्भ म्हणून या खंडांचे महत्त्व अमूल्य आहे. सातोस्करांची ही चतुरस्र कामगिरी पाहिल्यावर गोमंतकीय साहित्याच्या व संस्कृतीच्या क्षेत्रात सातोस्करांनी आपली नाममुद्रा किती ठाशीवपणे मुद्रित केलेली आहे हे सहजपणे लक्षात येते.

मुक्तिपूर्व आणि मुक्तीनंतरच्याही काळात साहित्य आणि संस्कृतीच्या क्षेत्रात गोमंतकीयांना भूषणास्पद वाटेल असे कार्य करणारे आणखी दोन महत्त्वाचे लेखक म्हणजे पं. महादेवशास्त्री जोशी आणि श्री. अ. का. प्रियोळकर हे होत. सत्तरीतले पं. महादेवशास्त्री हे लक्ष्मणराव सरदेसाई यांच्याएवढेच मराठी कथेत गाजलेले नाव. त्यांची कथारूपी 'कांचनाची निरांजने' मुक्तिपूर्व काळातच उजळून गेलेली होती. पण मुक्तीनंतरच्या काळात त्यांनी ललितलेखनाऐवजी कोशनिर्मितीच्या कार्याला वाहून घेतले. भारतीय संस्कृतीकोशाचे एकूण दहा खंड १९६२ ते १९७९ या काळात प्रसिद्ध झाले. श्री. व्य. केतकरांच्या ज्ञानकोशाप्रमाणेच या संस्कृतीकोशाचे कामही महादेवशास्त्री जोशींनी एकहाती पार पाडलेले आहे. अशा प्रकारचा एवढा भव्य असा कोश भारतात निर्माण झालेला नाही असे जाणकार सांगतात. या संस्कृतीकोशाच्या जवळजवळ प्रत्येक खंडाच्या तीन - तीन आवृत्त्या निघाव्यात यावरून भारतीय संस्कृतीविषयी वाचकांना किती अगत्याने जाणून घ्यावेसे वाटते हे लक्षात येते. या भारतीय संस्कृतीकोशाप्रमाणेच त्यांनी मुलांचा संस्कृतीकोशही तयार केलेला आहे. या कोशनिर्मितीच्या संदर्भातच पांडुरंग श्रीराम कामत यांनी असा एकहातीच निर्माण केलेल्या विश्वचरित्रकोशाचा उल्लेख करावा लागेल. ही कोशनिर्मिती आणि आठ वर्षे चालविलेले मांडवी हे दर्जेदार वाङ्मयीन नियतकालिक यामुळे गोमंतकीय साहित्यक्षेत्रात श्रीराम कामत यांचा आवर्जून उल्लेख करावा लागतो.

अ. का. प्रियोळकर यांनी ललित साहित्यलेखनाच्या क्षेत्रातही मुशाफिरी केलेली असली तरी मराठीतील एक अव्वल दर्जाचे संशोधक म्हणूनच ते मान्यता पावलेले आहेत. त्यांचे संशोधनकार्य मुक्तिपूर्व आणि मुक्तीनंतरच्या काळातही झालेले आहे. त्यांचा 'दमयंतिस्वयंवर'सारखा महाराष्ट्र - गोव्यातील सर्व विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात समाविष्ट होणारा संशोधित - संपादित ग्रंथ आणि 'मुक्तेश्वरांच्या महाभारता'चे चार खंड मुक्तिपूर्व काळात प्रसिद्ध झालेले असले तरी प्रियोळकरांचे बरेचसे संशोधन मुक्तीनंतरच्या काळातच प्रसिद्ध झालेले आहे. १९६१ नंतर कविवर्य मोरोपंतांच्या समग्र काव्याचे बारा खंड संपादित करून प्रकाशात आणले. जुनी हस्तलिखिते व दुर्मिळ पुस्तके मिळवून ती चिकित्सापूर्वक संपादित करून प्रकाशित करणे या कार्याला त्यांनी आयुष्यभर वाहून घेतले. अशी एकतीस पुस्तके त्यांनी संपादित केली आणि जुन्या हस्तलिखितांची पाठचिकित्सा करण्याची नवी पद्धतीही रूढ केली. त्यांच्या संशोधनकार्याचे खास वेगळेपण म्हणजे ख्रिस्ती मिशनऱ्यांनी लिहिलेली हस्तलिखिते मराठीत आणणे होय. सेंट पीटरचे मराठी पुराण, 'दौत्रिन क्रिस्ता', 'सांत अतुनिची अचर्या', 'सांत अंतनुची जिवित्वकथा' हे मिशनरी साहित्य मुक्तीनंतरच्या काळातच प्रसिद्ध झालेले आहेत. प्रियोळकरांच्या या संशोधनामुळे मराठीतील ख्रिस्ती साहित्याची परंपरा उजेडात आली. मराठी साहित्याची ख्रिस्ती परंपरा हा गोवा विद्यापीठात मराठीच्या अभ्यासाचा एक भाग बनलेला आहे. संपादित ग्रंथांबरोबरच प्रिंटिंग प्रेस इन इंडिया, द गोवा इन्क्विझिशन यासारखे स्वतंत्र ग्रंथ, सूचिग्रंथ, ललित साहित्य असे भरपूर लेखन करणाऱ्या प्रियोळकरांनी मराठी साहित्य व संशोधनक्षेत्रात केलेले योगदान अमूल्य आहे. प्रियोळकरांची संशोधन - संपादनाची ही परंपरा त्यांचे शिष्य प्रा. वि.

बा. प्रभुदेसाई यांनी पुढे चालविलेली आहे. उदाहरण, 'कृष्णदासश्यामारचित श्रीकृष्णचरित्रकथा', 'सर्वेश्वराचा ज्ञानोपदेश' हे संपादित ग्रंथ आणि 'सतराव्या शतकातील गोमंतकीय बोलीचे स्वरूप' हा प्रबंध विद्यापीठ पातळीवर पाठ्यग्रंथ व संदर्भग्रंथ म्हणून मान्यता पावलेला आहे.

आतापर्यंत मुक्तिपूर्व आणि मुक्तीनंतर अशा उभय कालावधीत कर्तृत्व गाजविणाऱ्या गोमंतकीय लेखकांचा विचार केला. बोरकरांच्या बरोबरीने काव्यलेखन करणाऱ्या 'नंदादीप'कार दामोदर अच्युत कारे यांचाही येथे उल्लेख केलाच पाहिजे. मुक्तीनंतर त्यांचा एकही कवितासंग्रह आलेला नाही.

पान ७ वर ▸

# साहित्यक्षेत्रातील नामवंत

▶ पान ४ वरून

पण गोमंतकीय मराठी कवितेचा विचार करताना बा. भ. बोरकर, द. अ. कारे आणि शंकर रामाणी या अग्रगण्य नावांशिवाय गोमंतकीय कवितेविषयी बोलताच येणार नाही. बोरकरांच्याप्रमाणेच सौंदर्यवादी कवितेची धारा समर्थपणे पुढे नेणाऱ्या पण स्वतःची वेगळी काव्यमुद्रा सिद्ध करणाऱ्या शंकर रामाणी यांचा 'कातरवेळ' हा सातोस्करांच्या सागर प्रकाशनाने प्रसिद्ध केलेला पहिला काव्यसंग्रह मुक्तिपूर्व काळात प्रसिद्ध झालेला असला तरी आभाळवाटा, पालाण, दर्पणीचे दीप आणि गर्भागार हे त्यांचे काव्यसंग्रह मुक्तीनंतरच्या काळातच प्रसिद्ध झालेले आहेत.

विलक्षण आत्ममग्न राहून पार्थिवाला लागलेली अपार्थिवाची ओढ विशिष्ट शैलीतून व्यक्त करणारी रामाणी यांची कविता मुक्तीनंतरच्या साहित्याचे वैशिष्ट्यपूर्ण लेणे आहे. मुक्तीनंतरच्या काळात गोमंतकीय कवी - लेखकांची जी अनेक नावे लक्षवेधकपणे पुढे आलेली आहेत. त्यात कवी म्हणून बोरकर - कारे - रामाणी या त्रिमूर्तीनंतर नरेंद्र बोडके यांचेच नाव घ्यावे लागते. विवेच्य काळात त्यांचा 'पंखपैल' हा एकच कवितासंग्रह आलेला असून 'सर्पसत्र', आणि 'शुकशकून' हे संग्रह १९९० नंतर व पन्नास वर्षांतील निवडक गोमंतकीय कवींच्या कवितांचे संपादन यावर्षी प्रकाशित झालेले असल्याने बोडके यांच्या काव्यकर्तृत्वाचा येथे विस्ताराने विचार केलेला नाही. पण आपल्या पहिल्याच काव्यकृतीने गोमंतकीय साहित्यावर ठसा उमटविणारे नरेंद्र बोडके यांच्यासारखे कवी गोव्यात थोडेच आहेत.

मुक्तीनंतरच्या काळात अनेक लेखक - कवी पुढे आलेले असले तरी या काळावर ठसा उमटवणारे सुभाष भेंडे, डॉ. अरुण हेबळेकर यांची नावे अग्रक्रमाने घ्यावी लागतील. गोमंतकीय साहित्यावरील रोमँटिसिझमचा प्रभाव पुसण्याचे श्रेय माझ्या मते सुभाष भेंडे, हेबळेकर आणि नरेंद्र बोडके यांनाच द्यावे लागेल. सुभाष भेंडे आणि अरुण हेबळेकर यांनी एकूण मराठी कथा - कादंबरीला समृद्ध करण्याचे कार्य केलेले आहे. या दोघांनीही केवळ प्रादेशिकतेच्या मर्यादेत राहून कादंबरीलेखन केलेले नाही. त्यांच्या कादंबऱ्यांच्या आशयविश्वाची विविधता लक्षणीय आहे. 'आमचे गोंय आमका जाय' मधून भेंडे यांनी आणि सलोमीचे नृत्य मधून मुक्तिपूर्व आणि मुक्तीनंतरच्या जीवनाचा अत्यंत वास्तववादी पद्धतीने वेध घेतलेला आहे. चक्वा, उद्ध्वस्त जोगीण या गोमंतकीय जीवनावरील किंवा अदेशी, बोन्साय, पैलतीर किंवा अंधारवाटा या महानगरीय कादंबऱ्यांतून समकालीन वास्तवाचा एक लेखक म्हणून वेध घेण्याची भेंडे यांची नैतिक दृष्टी महत्त्वाची वाटते.

१९६० नंतर मराठीत जी नवकादंबरी म्हणून ओळखली जाते त्यात अंधारवाटा ही महत्त्वाची कादंबरी ठरलेली आहे. हेबळेकर यांनी 'रुद्रमुख', 'ओ जॉनी' या लघुकादंबऱ्या आणि 'सलोमीचं नृत्य' या गोमंतकीय पार्श्वभूमीवरील वास्तववादी कादंबऱ्यानंतर पुढील आदित्य, भृगुसेतु, प्रवाळपारधी, चक्रमोहिनी, आ पार्सो, जोनास आर्क इ. कादंबऱ्यांतून वेगळी वाट चोखाळलेली आहे. यातील काही राजकीय पार्श्वभूमीवरच्या तर काही अद्भुत रहस्य थरार यामुळे वाचकांना पकडून ठेवणाऱ्या आहेत. पण गोमंतकीय साहित्यात विज्ञान कादंबरी आणि कथेचा प्रारंभ करण्याचे श्रेय हेबळेकरांनाच द्यावे लागेल. भेंडे आणि हेबळेकर दोघांनीही कथालेखन केलेले असले तरी सामाजिक कथांचा विचार करता हेबळेकरांचे कथालेखन व्यक्तिशः मला जास्त महत्त्वाचे वाटते.

सुभाष भेंडे व अरुण हेबळेकर यांच्याप्रमाणेच मराठी कादंबरीत आपली नाममुद्रा उमटविणारे दोन महत्त्वाचे गोमंतकीय कादंबरीकार म्हणजे वि. ज. बोरकर आणि स. शं. देसाई हे होते. अनाहतसारख्या पहिल्याच कादंबरीतून येशू ख्रिस्ताच्या जीवनचित्रणाचा वेगळा विषय मांडणाऱ्या बोरकरांनी जिराफ, माती आणि आदेश, नागझा, वंश या कादंबऱ्या लिहून मराठी कादंबरीत आपले वेगळेपण सिद्ध केलेले आहे तर १९६० नंतर मराठीत ऐतिहासिक कादंबरीचा जो जोमदार प्रवाह सुरू झाला त्यात मराठीतले महत्त्वाचे ऐतिहासिक कादंबरीकार म्हणून स. शं. देसाई यांनी नाव मिळविलेले आहे. देसाई हे स्वतः इतिहास संशोधनाच्या क्षेत्रात असल्याने इतर लेखकांप्रमाणे त्यांची मराठ्यांच्या इतिहासाकडे पाहण्याची दृष्टी केवळ गौरवाची किंवा नॉस्टॅल्जिक अशी नाही. त्यामुळे चंबळेच्या पलीकडे, महापर्व, अखेरची लढाई या त्यांच्या कादंबऱ्या इतिहासाचे वस्तुनिष्ठ आकलन करण्यात यशस्वी ठरतात.

मुक्तीनंतरच्या कथा- कादंबरीचा विचार करताना ज्ञानेश्वर कोलवेकर, नरेश कवडी ही नावे ठळकपणे पुढे येतात. प्रश्नचिन्ह, डेस्परेट आणि वावटळ या कादंबऱ्या आणि भोलानाथ हा कथासंग्रह असे मोजकेच लेखन करूनही मुक्तीनंतरच्या साहित्यावर कोलवेकर स्वतःचा वेगळा ठसा उमटविलेला आहे, पण मराठी समीक्षकांनी त्यांच्या साहित्याची पुरेशी दखल घेतलेली वाटत नाही. त्या तुलनेत मौजसारख्या मातब्बर प्रकाशनाचे लेखक म्हणून आणि आपल्या वेगळ्या घाटणीच्या कथालेखनाने नरेश कवडी हे नाव मराठी कथेच्या क्षेत्रात अपेक्षित झालेले आहे. 'बीयरची सहा कॅन्स' आणि 'चुळचुळ मुंगी पळी पळी कंटाळा' ही त्यांच्या कथासंग्रहाची शीर्षकेच कथेचे वेगळेपण स्पष्ट करणारी आहेत. कथेच्या बाबतीत मुक्तीनंतरच्या काळात जयराम पां. कामत, वासंती नाडकर्णी, यशवंत कर्णिक यांची उत्तम कथाकार म्हणून नोंद घ्यावीच लागेल.

खरेतर विवेच्य काळातील गोमंतकीय साहित्याबरोबर ठसा उमटविणारे म्हणून अनेक नावांचा उल्लेख करता येईल, पण स्थलाभावी ते इथे शक्य नसले तरी काही नावांचा निर्देश करणे अपरिहार्य ठरेल.

मुक्तीनंतरच्या काळात गोमंतकीय साहित्यक्षेत्रात डॉ. ग. बं. ग्रामोपाध्ये, डॉ. प्रल्हाद वडेर, डॉ. सोमनाथ कोमरपंत, श्री. एस्. एस्. नाडकर्णी, श्री. रवींद्र घवी या मराठीच्या अध्यापनक्षेत्रातील मंडळींनी दिलेले योगदान किती महत्त्वाचे आहे हे नव्याने सांगण्याची गरज नाही. त्यांच्या वाङ्मयीन कर्तृत्वाचे स्वतंत्रपणेच विवेचन केले पाहिजे.

तसेच मराठी नाटक आणि रंगभूमीवर मो. ग. रांगणेकर यांच्यानंतर कर्तृत्व गाजविणाऱ्या हिराकांत कलगुटकर, बकन प्रभू, वसंत कामत या गोमंतकीयांचा पण स्वतंत्र विचार करावा लागेल. मुक्तीनंतरच्या काळात नाटककार म्हणून स्वतःचा ठसा उमटविणारे विष्णू सूर्या वाघ यांचे नाट्यलेखन या विवेचनासाठी आखून घेतलेल्या कालमर्यादेत बसणारे नाही. त्यामुळे त्यांचाही येथे विचार केलेला नाही. पण येथे केलेले विवेचन परिपूर्ण नसले तरी मुक्तीनंतरच्या पाव शतकांत गोमंतकीय साहित्यात आपली नाममुद्रा ठळकपणे उमटविणाऱ्या व्यक्तिमत्त्वांची कल्पना तरी या विवेचनावरून वाचकांना येईल.

■■■■